सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/प्र.क्र.३३/पोल-३, दि.१०/१२/२०२५

**विषय :-** ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प पुरवठादाराचे देयक अदा करणेबाबत..

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/प्र.क्र.३३/पोल-३, दि.१०/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२१०१९२७१३९०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 11-12-2025 16:16:37

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे करिता

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, ठाणे शहर
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प पुरवठादाराचे देयक अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ३६२५/प्र.क्र.३३/पोल-३**
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १० डिसेंबर, २०२५.

वाचा :-

१) गृह विभाग, शासन निर्णय क्र. आयएसएस १००९/प्र.क्र.३१३/विशा-४, दि. २७.७.२०११.
२) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समिती (H.P.C.) च्या दि.५.७.२०२३, दि. ९.१०.२०२३, दि.६.३.२०२४, दि.२७.५.२०२४, दि.३०.९.२०२४, दि.९.४.२०२५ व दि.०६.११.२०२५ रोजीच्या बैठकांचे इतिवृत्त.
३) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील प्रकल्प अंमलबजावणी समिती (P.I.C.) च्या दि.१.८.२०२३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.५.१.२०२४. दि.९.४.२०२५.
५) गृह विभाग, शासन पूरकपत्र क्र. सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.५.७.२०२४.
६) अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/ ठाणे शहर CCTV प्रकल्प/ २८/२०२१ दि. २.१०.२०२४ चे MSA बाबतचे पत्र.
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.७.४.२०२५.
८) गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण ३६२५/प्र.क्र.३३/पोल-३, दि. २९.४.२०२५, दि.२२.०७.२०२५ व दि. २६.०८.२०२५
९) System Integrator मे. M/s. Siddharth Infratech & Services Pvt. Ltd. Hyderabad यांचे देयक दि.१०.११.२०२५.२०२५ व दि. २०.११.२०२५
१०) पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पत्र क्र. CP THN/CCTV/SI Bill/2026/२०२५, दि. २६.११.२०२५
११) अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/ ठाणे शहर CCTV प्रकल्प/ २८/२०२१ दि.२८.११.२०२५

प्रस्तावना :-

मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दि.२४ जुलै, २०११ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार मुंबई शहर व राज्यात इतरत्र सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबतची निर्णय प्रक्रिया सुलभ करण्यासाठी दि.२७ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "उच्चस्तरीय शक्तीप्रदत्त समिती" (High Power Committee) स्थापन करण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये सुरक्षा विषयक उपाययोजना करण्याकरिता आवश्यक ते सर्व निर्णय घेण्यासाठी सदर समितीला प्राधिकृत करण्यात आले. तथापि, तत्कालीन मा. मुख्य सचिव यांच्या सुचनेनुसार गृह विभागाच्या दि.४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गृह विभागातील विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीत एकसुत्रता रहावी म्हणून विविध शहरात सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतचा विषय अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत समाविष्ट करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील शहरांमध्ये नागरिकीकरण व औद्योगिकीकरण यामुळे लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न, गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ, यांचा विचार करुन "सुरक्षित शहर" ही संकल्पना राबविताना "सीसीटीव्ही यंत्रणा" बसविणे ही बाब महत्वाची ठरते. राज्यातील शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्री व निधी उपलब्धता विचारात घेऊन गृह विभागाने प्राधान्यक्रमांसह धोरण तयार केले. यामध्ये प्राधान्यक्रम ३ वर ठाणे शहराचा समावेश आहे.

३. “ठाणे पोलीस आयुक्तालयाने अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ९.१०.२०२३ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीमध्ये सादर केलेल्या ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात वाढीव एकूण ६०५१ सीसीटीव्ही कॅमेराच्या रु.४९२,८९,४१,१६७/- (अक्षरी रुपये चारशे ब्याण्णव कोटी एकोणनव्वद लाख एकेचाळीस हजार एकशे सदुसष्ट फक्त) एवढ्या रक्कमेच्या प्रकल्प अहवालास ५ जानेवारी,२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दि.३०.९.२०२४ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

४. दि.९.४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे “ठाणे पोलीस आयुक्तालयाने अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ३०.९.२०२४ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीमध्ये सादर केलेल्या ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात वाढीव एकूण ६०५१ सीसीटीव्ही कॅमेराच्या रु.५७५,८७,८१,३६२/-(अक्षरी रुपये पाचशे पंच्याहत्तर कोटी सत्त्याऐंशी लाख एक्याऐंशी हजार तीनशे बासष्ट फक्त) (जीएसटीसह) एवढ्या रक्कमेच्या प्रकल्प अहवालास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

५. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाअंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे उभारणी करीता M/s. Siddharth Infratech & Services (I) Pvt.ltd. Hyderabad यांना System Integrator or Lead Bidder म्हणून दि.०३/१०/२०२४ रोजी सेवा पुरवठा आदेश दिलेले आहेत. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात उपरोक्त संदर्भाधीन क्र. ८ येथील दि. २९.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये Design, Development, Implementation and Maintenance of CCTV based Surveillance System for Thane City (T+१२ Milestone Project Planning & Design phase documents चे रू.१७,२५,९०,८५९/- इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. दि. २२ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये Milestone Supply & Installation of ZRS and Milestone: Supply & Installation of ICCC चे रू.१६,४२,४१,३०५/- इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, दि. २६ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू.१६,७२,८९,८५३/- इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

६. ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाचे पुरवढादार/कंत्राटदार M/s. Sri.Siddharth Infratech & Services (१) Pvt.ltd. Hyderabad यांनी केलेल्या Millestone नुसार (कामानुसार/पुरवठ्यानुसार) Milestone T+५६ आणि Milestone T+५८ ची देयके सादर केली असून सदर देयकांचा तपशील पुढीलप्रमाणे :

| अ. क्र. | देयकाचा तपशील | देयकाचा दिनांक | देयकानुसार मागणी करण्यात आलेली एकूण रक्कम. | अनुज्ञेय रक्कम. |
|---|---|---|---|---|
| १ | Invoice for Supply, Installation of compute and Storage, Network Infrastructure required and other IT and non- IT Infrastructure for commissioning of components at Backup Recording Station (BRS) along with application license (Milestone T+५६) | १०/११/२०२५ | रू.६,८४,७७,४२९/- | रू.६,८४,७७,४२९/- |
| २ | Invoice for Configuration, Testing and Commissioning of all components part including application portfolio required to commission for backup recording station (Milestone T+५८) | २०/११/२०२५ | रू. ८,६२,९५,४३०/- | रू. ८,६२,९५,४३०/- |
| | एकूण देयक रक्कम | | रू.१५,४७,७२,८५९/- | रू.१५,४७,७२,८५९/- |

८. ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प पुरवठादार M/s. Sri. Siddharth Infratech & Services (१) Pvt. ltd. Hyderabad यांनी सादर केलेल्या देयकांतील कामांची पडताळणी प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार M/s. PricewaterhouseCoopers (PwC) Pvt. Ltd Mumbai आणि पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी केली असून ती बरोबर आहेत. त्याचप्रमाणे Milestone T+५६ आणि Milestone T+५८ चे काम समाधानकारक होते. तरी, सदर देयके अदा करण्यास मान्यता देऊन निधी वितरित करण्याबाबत पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी दि. २६ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

९. पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.२७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्राद्वारे ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे System Integrator (SI) M/s. Siddharth Infratech & Services Pvt. Ltd. Hyderabad यांचे रू. १५,४७,७२,८५९/- (जीएसटीसह) (अक्षरी रुपये पंधरा कोटी सत्तेचाळीस लाख बाहत्तर हजार आठशे एकोणसाठ फक्त) इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक निधी बीडीएस प्रणालीवर तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भाधीन क्र. ११ येथील दि. २८ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुसार सदर देयक अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प पुरवठादार M/s. Sri. Siddharth Infratech & Services (१) Pvt. ltd. Hyderabad यांनी Supply, Installation of compute and Storage, Network Infrastructure required and other IT and non- IT Infrastructure for commissioning of components at Backup Recording Station (BRS) along with application license (Milestone T+५६) रू.६,८४,७७,४२९/- (with GST) आणि Configuration, Testing and Commissioning of all components part including application portfolio required to commission for backup recording station (Milestone T+५८) रू८,६२,९५,४३०/-(with GST) असे **जीएसटीसह एकूण रूपये १५,४७,७२,८५९/- (रूपये पंधरा कोटी सत्तेचाळीस लाख बाहत्तर हजार आठशे एकोणसाठ फक्त)** इतक्या रकमेची देयके अदा करण्याकरिता निधी वितरित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा "मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२ यंत्रसामुग्री साधनसामुग्री" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२५-२६ वर्षाच्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

३. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दि.५.१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली असून सदर प्रकल्पांचा निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस आयुक्त,ठाणे यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून तसेच त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२७.५.२०२४,दि.३०.९.२०२४, दि.९.४.२०२५ व दि. ०६.११.२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.७६८/२०२५/व्यय-७ दि.०३.१२.२०२५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार तसेच वित्त विभाग,शासन परिपत्रक दि.७.४.२०२५ मधील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आला असून त्याचा संकेतांक २०२५१२१०१९२७१३९०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac445 51976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9C EABCD514095659A6CDFAC856815518DCD188 C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.12.10 19:59:49 +05'30'

( रा. ता. भालवणे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
१२. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
१३. आयुक्त, भिवंडी निझामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि. ठाणे.
१४. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर जि. ठाणे.
१५. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ, जि. ठाणे.
१६. मुख्याधिकारी, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद, अंबरनाथ, जि. ठाणे.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १ / २ , मुंबई/नागपूर.
१८. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
२०. सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग (व्यय-७ / वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई.
२१. उपसचिव (अर्थसंकल्प शाखा) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. M/s. Siddharth Infratech & Services (I) Pvt.ltd. Hyderabad
२३. निवडनस्ती पोल-३.